अभंग.

ऐसें जें अखंड ... ॐ

त्याचा साक्षात ...

महाराजा ! श्रीमद्विद्यारण्य-स्व...

शाश्वत, नि... प्रार्थना

ऐसें जें अ...

महारा... आत्मज्ञानप्रापक प्रार्थनापंचाशत्क.

( मूळ संस्कृत ... अभंगात्मक रूपांतर. )



रचनाकार—बाळकृष्ण भाऊ जोशी, पुणें.

आगस्ट, सन १९२१

किंमत २ आणे.

ॐ

श्रीमद्विद्यारण्य-स्वामिविरचित

# सद्गुरुप्रार्थना.

( अभंगात्मक रूपांतर )

[ मूलसंस्कृत आणि त्याचें मराठी भाषांतर हीं दोन्ही पुस्तकरूपानें प्रथम छापून काढलीं. त्यानंतर, एकाद्या जिज्ञासु मुमुक्षूला हें प्रकरणपाठांत घ्यावेंसें वाटल्यास त्याला उपयोग व्हावा, अशा हेतूनें हें अभंगात्मक रूपांतर तयार केलें. वेदान्तज्ञानलालसेनें कोणी भाविक जन त्याचा तसा उपयोग करून घेतील असें समजूं. ]

## मंगलाचरण.

आरंभीं श्रीगुरुराजयाचीं पदें । नमूं या आनंदें प्रेमभरें. १

मागुती सद्गुरुप्रार्थना-अभंग । रचूं भवभंग व्हावयास. २

गुरुराय मज कृपाळु अत्यंत । चित्तीं जो ये हेत तो तो साधी. ३

येतुल्या आभारां व्हाया उतराई । थोर कैचा काई या जनातें ४

याचिलागीं अंगें अर्पुनी मीपणा । श्रीगुरुचरणां नमूं पुन्हां. ५

महाराजा ! ऐसा अनुग्रह थोर । करा मजवर कृपासिंधो ! ६

## ( १ )

हिरण्यगर्भाहून स्थावरांपर्यंत । देह जे अनंत तिहीं लोकीं १

तया सर्वांमाजी एक जें चैतन्य । मीच तें, न अन्य दुजें कोणी २

ऐसा ज्ञानबोध माझिया चित्तांत । दृढ होवो स्थित निरंतर ३

महाराजा ! ऐसा अनुग्रह थोर । करा मजवर कृपासिंधो !

( २ )

चित्त ब्रह्मामाजी करूं जातां स्थिर । विघ्नें देखा
येई निद्राभर, चित्त करी लीन । कीं संकल्पेंरा
किंवा कोणे एके विकाराचा भर । होउनी अंतः
कषाय हा ऐसा येतसे हो आड । किंवा सुख ग
तेंही वेधी मना, रिघूं नेदी पुढें । आत्मपदाकडे प
ऐसीं सर्व विघ्नें वोसंडून झणीं । ब्रह्माच्या ठिकाणीं जो मन
महाराजा ! ऐसा अनुग्रह थोर । करा मजवर कृपासिंधो ! ७

( ३ )

ब्रह्म हें शाश्वत, स्पर्शेना विकारीं । संगही न करी कोणाशीं १
तयाऐसें आन तेंही नाहीं कोण । एक परिपूर्ण तेंचि सदा. २
सत्तारूप, ज्ञानरूप, सुखघन । स्वयें प्रकाशून सदा राहे. ३
ऐसा हा ब्रह्माचा येवो अनुभव । ठसावूनि भाव पूर्णपणें. ४
महाराजा ! ऐसा अनुग्रह थोर । करा मजवर कृपासिंधो ! ५

( ४ )

अहंकार हा तों ज्ञेय दृश्य जड । आत्मा तो उघड भिन्न त्यासी
मी या भावें आत्मा समस्तां प्रतीत । राहे अंतरांत गूढपणें २
चैतन्य हें त्याचें रूप सुनिश्चित । तेंचि अनुभूत मला व्हावें ३
महाराजा ! ऐसा अनुग्रह थोर । करा मजवर कृपासिंधो ! ४

( ५ )

वृक्षाचा पाषाणाशीं जो भिन्नपणा । भेद तो जाणावा विजातीय.
वृक्षाचा जो आन वृक्षांसवें भेद । सजातीय पद दीजे त्यातें २
आणि वृक्षाचा जो भेद फांदीपानां । स्वगताभिधाना पाविजे तो
परी त्रिविधहि भेद हे जयास । नातळती खास कदाकाळीं ४

ऐसें जें अखंड सच्चित्सुखघन । अद्वितीय घन परब्रह्म ५
त्याचा साक्षात्कार पूर्णपणें मला । सिद्ध व्हावा भला ह्मणीं आतां
महाराजा ! ऐसा अनुग्रह थोर । करा मजवर कृपासिंधो ! ७

( ६ )

शाश्वत, निर्मल, सर्वबंधातीत । सत्य, ज्ञानयुत, सुखरूप १
ऐसें जें अद्वय शुद्ध ब्रह्म पर । तें मज सत्वर व्हावें सिद्ध २
महाराजा, ऐसा अनुग्रह थोर । करा मजवर कृपासिंधो ! ३

( ७ )

कोणेही परीचा भेद जेथें नाहीं । सच्चिदानंद हीं खूण ज्याची १
ऐसें जें कां पर ब्रह्म त्यापासून । आत्मा नोहे आन कूटस्थ जो २
अंतर्यामी सर्व-साक्षी या आत्मया । ऐक्य पूर्णतया परब्रह्मीं ३
या रिती एकता चैतन्यात्मयांची । आकळावी साची मन्मतीतें
महाराजा ! ऐसा अनुग्रह थोर । करा मजवर कृपासिंधो ! ५

( ८ )

आपणावेगळें विश्व पुढें जें हें । दृष्टी येत आहे आपुलिया १
विलास तो स्वीय अविद्येचा सारा । ते स्थळीं दुसरा नसे कोणी
म्हणोनि हें सारें स्वात्ममात्र आहे । एक ब्रह्म पाहे निश्चयानें ३
तरी ऐसा मज पूर्ण साक्षात्कार । घडावा सत्वर आत्मत्वाचा ४
महाराजा ! ऐसा अनुग्रह थोर । करा मजवर कृपासिंधो ! ५

( ९ )

'मीच ब्रह्म' ऐशा एकत्वालागून । कल्पना या दोन येती आड
असंभव एक उद्भवे मनांत । यद्वा विपरीत भाव उठे २
'मी तों एक अणु, ब्रह्म तें केवढें । माझें काय घडे ऐक्य त्याशीं'
यद्वा ' मी पामर कोणेहि प्रकारें । ब्रह्म साचोकारें न होईच'

ऐशी अनुक्रमें दोषींची त्या खूण । त्यांचें निवारण व्हावें मज
मग तळहातींच्या आमलकासम । मीच पर ब्रह्म ऐसें ज्ञान ६
निर्बाधपणानें यावें अनुभवा । साक्षात्कार व्हावा ऐसा दृढ ७
महाराजा ! ऐसा अनुग्रह थोर । करा मजवर कृपासिंधो ! ८

( १० )

ब्रह्मदेवाहूनि स्तंबावरी बा रे । प्राणी जे कां सारे वर्तताती १
त्या सर्वांच्या देहा·आंत साक्षीभूत । आत्मा जो प्रतीत होत आहे २
तोंचि मज मुमुक्षूचें रूप मूळ । परिपूर्ण स्थळ सर्व कांहीं ३
याचिलागीं तैसा आत्मसाक्षात्कार । मज निरंतर प्राप्त व्हावा ४
महाराजा ! ऐसा अनुग्रह थोर । करा मजवर कृपासिंधो ! ५

( ११ )

मनोनाश आणि वासनांचा क्षय । तिसरा उपाय तत्त्वज्ञान १
यांचिया अभ्यासें माझें सुरक्षित । राहावें निश्चित आत्मज्ञानें २
तप व्हावें सिद्धें, बुद्धि व्हावी शम । दुःखही विराम पावो सारें ३
आणि शेवटीं तें सुख अखंडित । प्रगटो संतत अंतरंगीं. ४
मनोनाशादिक त्रय अभ्यासितां । येवोत या हातां पांच गोष्टी
महाराजा ! ऐसा अनुग्रह थोर । करा मजवर कृपासिंधो ! ६

( १२ )

सुखी जनांसवें दावावी मित्रता । कारुण्य दुःखितांसंबंधानें १
आणि पुण्यशीलां देखुनि तोषावें । दूर वोसंडावें पापियांतें २
ऐशा सद्वासना सिद्ध व्हाव्या चारी । मज बळावरी अभ्यासाच्या
आणि त्यांहीं सर्व आसक्त्यादि दुष्ट । वासनाही नष्ट व्हाव्या वेगीं ४
महाराजा ! ऐसा अनुग्रह थोर । करा मजवर कृपासिंधो ! ५

( १३ )

चालावें अखंड आत्मानुसंधान । तेणें योगें मन स्थिर व्हावें १
मग तें वृत्तीसी येऊं विसरावें । संकल्पाच्या नांवें व्हावें शून्य २
या रीति निरोधावस्था संपादून । राहो तें उन्मन होऊनियां ३
महाराजा ! ऐसा अनुग्रह थोर । करा मजवर कृपासिंधो ! ४

( १४ )

शमदमादिकें साधनें साधून । श्रवण मनन घडो मातें, १
सवेंचि लागावा मना निदिध्यास । यावा पूर्णतेस अभ्यास तो २
मग तेणें योगें विषयासक्ति मरो । मति तेहि शिरो सूक्ष्म देशीं ३
ब्रह्मात्मैक्याविषीं जो कां विपर्यय । तोहि पावो लय दुराग्रहें ४
सवेंच कुतर्क व्हावेत ते दूर । प्रतिबंध हे चार ऐसे जावे ५
मग तो निर्बाधपणें निरंतर । ब्रह्मसाक्षात्कार दृढ होवो, ६
महाराजा ! ऐसा अनुग्रह थोर । करा मजवर कृपासिंधो ! ७

(१५)

उपक्रम–उपसंहारादि सहा । खुणा होती पहा ग्रंथार्थाच्या १
त्यांहीं सर्व वेदान्ताचा ठाव घेतां । निर्णय ये हाता अद्वैताचा २
ह्मणोनि तैसाचि निश्चय हो मम । कीं हें परब्रह्म एकीएक ३
महाराजा, ऐसा अनुग्रह थोर । करा मजवर कृपासिंधो ! ४

(१६)

आधीं गुरुमुखें करावें हें श्रुत । वस्तु ही अद्वैत आत्मरूप १
मग वेदान्तींचा युक्तिवाद सारा । धरावा अंतरामाजी नीट २
सवेंचि त्याचिया नित्यचिंतनांत । आदरें प्रवृत्त व्हावें जीवें ३
ऐसें मजलागीं घडो अखंडित । चिंतन अद्वैत-आत्मयाचें ४
महाराजा ! ऐसा अनुग्रह थोर । करा मजवर कृपासिंधो ! ५

(१७)

सच्चित्सुखघन आत्म्याचा प्रत्यय । त्यास **सजातीय** ऐसें नांव
त्यामाजी देहादि-भान जें उद्भवे । **विजातीय** नांवें बोलिजे तें
माझ्या आत्म-प्रत्ययाच्या प्रवाहांत । विजातीय द्वैत नये उठूं ३
अखंडितपणें आत्मभावना ते । प्राप्त व्हावी मातें सदोदित ४
महाराजा ! ऐसा अनुग्रह थोर । करा मजवर कृपासिंधो ! ५

(१८)

असंग चिद्रूप आत्मा मी या भावें । चित्त प्रवेशावें निजरूपीं
मग तें संस्कार-रूपें मात्र राही । वृत्ति सर्व कांहीं विसरूनी २
ऐशा सूक्ष्मरूपें अवस्थित चित्तीं । नित्य ये प्रतीती आनंदाची
ऐसा स्वस्वरूप भूत निजानंद । सेवूनि मी धुंद राहावा जी ४
महाराजा ! ऐसा अनुग्रह थोर । करा मजवर कृपासिंधो ! ५

(१९)

आत्मा मी केवल साक्षी ज्ञानघन । केउतें अज्ञान यावें येथें १
अज्ञानाचें कार्य जग तेंही मग । कैसें पावे लाग मद्रूपीं या २
नित्य शुद्ध बुद्ध सत्य सुखमय । मुक्त मी अद्वय परब्रह्म ३
ऐसा अभेदाचा बाणलिया भाव । त्यास येत नांव **समाधि** हें ४
तेथ द्रष्टा तोचि दृश्य असे साचा । अंतःसमाधीचा विवेक हा
आणि बहिःसमाधीचें ऐसें फळ । विश्व हें सकळ परब्रह्म ६
ऐसें अंतर्बहिः-समाधीपासून । विवेकाचें धन सांठो माझें ७
मग त्या सुदृढ विवेकाच्या बळें । देहभाव गळे निश्चयेंसी ८
ऐसें पूर्ण परमात्मतत्त्व मला । साक्षादनुभवाला येवो वेगीं ९
महाराजा ! ऐसा अनुग्रह थोर । करा मजवर कृपासिंधो ! १०

(२०)

धार जलाची कीं सर्पचि भासला । रज्जूवरी भला कोणेकाळें १
तरी त्यामीतरीं जैसी एक दोरी । आहे सर्वभरीं व्यापूनियां २
तेवीं आत्मा सर्व नामरूपात्मक । वस्तूंमाजी एक व्यापलासे ३
तोचि आत्मदेव सच्चित्सुखघन । बोलती सज्जन पर-शब्दें ४
आणि देहाआंत प्रत्यगात्मभूत । नांदे जो संतत जीवरूपें ५
अहंभावादिकां जो कां जाणतसे । त्यास शब्द असे अवर हा.
पर-अवर हे एकरूप जाण । त्यांस भिन्नपण खरें नाहीं ७
ब्रह्मचि एकलें बहिरंतरीं क्रमें । पर अवर-नामें ठाकलेंसे ८
'देवी भगवती, तूं ती मचि होशी । मी तो तूंच' ऐशी श्रुति असे
तेविं 'परब्रह्म मद्रूप निश्चयें । आणि मीहि स्वयें ब्रह्मरूप १०
ऐशी दोहीं परी एकतानता ती । संपादावी अती निश्चयानें १
मग तो परावर–ब्रह्मसाक्षात्कार । नित्यनिरंतर प्राप्त होतां १२
तेणें अंतरींचा ग्रंथिभेद होवो । संशयही जावो लया सारा १३
आणि सर्व कर्मांलागीं होवो क्षय । एक-अद्वितीय ब्रह्मपणें १४
ऐसा मज मुख्य पुरुषार्थाचा लाहो । आतां सत्वर हो परिपूर्ण५
महाराजा, ऐसा अनुग्रह थोर । करा मजवर कृपासिंधो ! १६

( २१ )

अहंभाव जो कां, तोचि आत्मा खरा । भ्रम हा अंतरामाजी उठे
तेचि हृदयांतील ग्रंथि असे मूळ । जीवा लावी खूळ संसाराचें
तिचा होवो चूर, भ्रम जावो दूर । बोध निरंतर दृढावो हा ३
महाराजा, ऐसा अनुग्रह थोर । करा मजवर कृपासिंधो ! ४

( २२ )

देहद्वयाहून आत्मा कोणी दुजा । किंवा महाराजा, तोचि असे ?

हो कां दुजा परी, कर्ताभोक्ता होई । किंवा त्यास काई न लागे हें
न लागो हें कोणी, ब्रह्माशीं तो परी । एक, किंवा उरी असे कांहीं
एक हो कां परी, त्याचें फक्त ज्ञान । देई मोक्षधन किंवा नाहीं?
किंवा त्या ज्ञानातें कर्म व्हावें सर्वें । मोक्षास पावावें तरी मग ?
आणि आत्मा तो हा साक्षित्वानें वर्ते । किंवा धरी कर्ते-पण कांहीं
वर्तो साक्षित्वानें, परी त्याकारण । आहे ब्रह्मपण किंवा नाहीं ?
असो ब्रह्मपण, परी तें बुद्धीस । येई जाणायास किंवा न ये ? ८
येवो वा जाणाया, जाणल्यानें एकें । मोक्षपद निकें मिळे काय ?
आणि मजलागीं साचोकारें जाण । असे ब्रह्मपण किंवा नाहीं ?
असो ब्रह्मपण, परी तें साक्षात । होईल प्रतीत किंवा नाहीं ? ११
प्रतीत हो परी त्याउपरी मातें । कर्तव्य राहतें कीं न राहे १२
नसो तें कर्तव्य, परी तेच वेळे । जीवन्मुक्ति मिळे किंवा नाहीं?
जीवन्मुक्ति मिळो, परी देहपातीं । विदेहमुक्ति ती मिळेल कां ?
तीहि मिळो परी पुनः कालांतरीं । लागेल शरीरीं येणें काय ?
ऐशापरी नाना संशयांची खेचं । जाहली जे साच मनीं माझे
तयांचा निरास होवोनिया पूर्ण । बुद्धि पावो तूर्ण विरामास १७
महाराजा, ऐसा अनुग्रह थोर । करा मजवर कृपासिंधो ! १८

( २३ )

नैककोटि जन्मींहून ग्यां जीं केलीं । कर्में बुरीं-भलीं अहंतेनें १
जीं यापुढें सदा सिद्ध ठाकलींत । आणिका जन्मांत फळ द्याया
त्या सर्व संचितकर्मांचा निरास । व्हावा हीच आस मनीं एक
तरी त्याजसाठीं मोक्ष हा चतुर्थ । साधो पुरुषार्थ मला नीट ४
महाराजा, ऐसा अनुग्रह थोर । करा मजवर कृपासिंधो ! ५

( २४ )

पूर्णानंदरूप जो कां पूर्णबोध । तोचि मी निर्बाध परब्रह्म १
ऐसा ब्रह्मात्मैक्यानुभव निश्चयें । प्राप्त होवो स्वयें मन्मतीतें २
आणि त्याच योगीं बुद्धि निरंतर । राहो हेंच सार ओळखून ३
महाराजा, ऐसा अनुग्रह थोर । करा मजवर कृपासिंधो ! ४

( २५ )

जेव कोणे वेळीं चित्तीं नाहीं जग । निद्राहि ती बघ नसे आली १
ते वेळीं जें कांहीं सुख निरायास । येई प्रत्ययास अंतरंगीं २
त्याचें नांव ब्रह्मानंद ऐसें जनीं । तें मजलागुनी सदा लाभो ३
महाराजा, ऐसा अनुग्रह थोर । करा मजवर कृपासिंधो ! ४

( २६ )

संकल्पविकल्प मनाचे व्यापार । मनीं निरंतर चाललेती १
राहती ते जेव्हां, ते वेळीं जें एक । प्रत्यया ये सुख निजांगींच २
तेंचि शुद्ध आत्मरूप ऐसा भाव । दृढ धरो ठाव मनीं माझे ३
महाराजा, ऐसा अनुग्रह थोर । करा मजवर कृपासिंधो ! ४

( २७ )

स्वप्नींचे देखावे जे ते सर्व कांहीं । आपणाचि; नाहीं दुजें तेथ १
तैशीच परी या जागृतीची जाण । आपुलियावीण नाहीं कांहीं २
याचिकारणें हा आत्मा अद्वितीय । शास्त्रांहीं निश्चय असे केला ३
हाचि अद्वयात्मपणा अनुभवा । येऊनियां व्हावा दृढ पूर्ण ४
महाराजा, ऐसा अनुग्रह थोर । करा मजवर कृपासिंधो ! ५

( २८ )

मनोनाश आणि वासनांचा क्षय । हें उपायद्वय साधकाचें १
अभ्यासें तयांच्या चित्त निर्वासन । आणि वृत्तिहीन होइजेतें २

दोषद्वय जें कां होय विरोधक । साधकासी देख आत्मज्ञानीं ३
तें या अभ्यासानें पावताहे लय । नामें जें संशय-विपर्यय ४
यांचिया निरासें माझें आत्मज्ञान । राहो चिरंतन सुरक्षित ५
महाराजा, ऐसा अनुग्रह थोर । करा मजवर कृपासिंधो ! ६

( २९ )

योगभूमिका जी पंचम कीं षष्ठ । सप्तमही श्रेष्ठ सर्वांतील १
जीवमुक्ताची ती लाहूनियां स्थिति । द्वैत येना चित्तीं ऐसें होवो
सर्वेंचि संशय किंवा विपर्यय । दोहोंचाही लय होवो पूर्ण ३
आणि तेणें तत्वज्ञानाचें रक्षण । होवो बाधेवीण निरंतर ४
महाराजा, ऐसा अनुग्रह थोर । करा मजवर कृपासिंधो ! ५

( ३० )

स्वप्नीं नसे स्थूल[1] देहाचें या भान । लिंगदेह[2]ही न निद्रेमाजी
तैसाचि कारण[3]-देह केधवांही । समाधींत पाहीं आढळेना २
परी या जागृति-स्वप्न-सुषुप्तींत । समाधिस्थितींतही जो सदा ३
राहे निरंतर एक अखंडित । माळेच्या मण्यांत जैसा दोरा ४
तोचि मी चिद्रूप आत्मा हा निश्चय । जाणिजे अन्वय व्यतिरेकें
मग देहत्रय-भान वोसंडून । नित्यानुसंधान साक्षित्वाचें ६
या रिती त्रिदेहांवेगळा जो ठाव । तो चैतन्यात्मभाव मज लाभो
महाराजा ! ऐसा अनुग्रह थोर । करा मजवर कृपासिंधो ! ८

( ३१ )

भगवान वासुदेवावरी चित्त । ठेवून मी ध्यात आहें त्यातें १
तरी माझें प्रेम अवलोकून तया । येवो माझी दया आतां क्षणीं
मग तेणें अंतरंगीं कीजे वास । मज बालकास उद्धराया ३
मग विवेकाचा दीप पेटवून । तम निरसन कीजे तेणें. ४

भक्तीचा प्रसाद तया दीपालागीं। तैलाचिये जागीं होवो मम
माझ्या भक्तिप्रेमें वश होय हरी। मग तो घेई करीं मज दीना
तोचि हरिप्रेमा माझ्या दीपाप्रत। करो प्रवर्तित वायुऐसा ७
ब्रह्मचर्यादिक साधनांहीं शुद्धि। पावली जे बुद्धि ते हो वात
विषयांची रुचि न लागेचि जया। म्हणूं त्या हृदया ठाणवई
नाना व्यवहारीं निवृत्ति या मना। क्षुब्ध तें होईना रागद्वेषें,
म्हणोनि तोचि या ज्ञानदीपाप्रत। होऊं दे निवात कोनाडाच
चालतसे नित्य एकाग्र जें ध्यान। तेंच तेज छान तया दीपा.
ऐसा तो सुंदर विवेकाचा दिवा। देवें प्रज्वाळावा मजमाजी १३
मग अज्ञानाचे मिथ्याभास जे जे। ते ते त्याच्या तेजें निरसून
अविवेकाचें फळ मोह जो केवळ। होवो तो निर्मूळ क्षणाधांत
महाराजा। ऐसा अनुग्रह थोर। करा मजवर कृपासिंधो! १६

(३२)

श्रीहरीसी नित्य जे कां उपासिती। ठेवूनियां प्रीति तत्पदांसी १
त्यांसि तो श्रीहरी शुद्ध-ज्ञानरूपी। बुद्धियोग अर्पी निजप्रेमें २
मग ते भक्त तेणें आत्मतत्वा लाहून। श्रीहरिसदन पावतात ३
यालागीं तो बुद्धियोग देवें मज। अर्पावाचि आज कारुण्यानें ४
महाराजा, ऐसा अनुग्रह थोर। करा मजवर कृपासिंधो! ५

(३३)

निर्विकार आत्मा पावला विकार। मग हा विश्वाकार प्रगटला १
ऐसें नाहीं खरें; विश्व हें त्या ठायीं। अध्यासाचे पायीं भासताहे २
म्हणून स्वरूपबोध न सांडितां। साक्षी व्हावें स्वतां जगद्भासा ३
ऐसा साक्षित्वाचा भाव सदोदित। माझ्या अंतरांत प्रगट हो ४
महाराजा, ऐसा अनुग्रह थोर। करा मजवर कृपासिंधो! ५

( ३४ )

देहेंद्रियादिकां सर्व या जडांला । आत्माचि एकला प्रकाशवी १
ऐसा हा आत्म्याचा चैतन्यानुभव । मजसी सदैव होत राहो २
महाराजा ! ऐसा अनुग्रह थोर । करा मजवर कृपासिंधो ! ३

( ३५ )

आपण तो केव्हां कोणातेंही काय । नकोसा न होय कालत्रयीं १
तैसेंचि आपणाहून आवडतें । दुजें नाहींच तें कोणा कोठें २
याचिलागीं आत्मा परमानंदघन । भाव हा सज्जन जाणतात ३
तोचि आनंदानुभव आत्मयाचा । मजसि हो साचा निरंतर ४
महाराजा ! ऐसा अनुग्रह थोर । करा मजवर कृपासिंधो ! ५

( ३६ )

अहंकारादिकें हीं तों सारीं जड । दुःखद उघड आणि मिथ्या·
इया सर्वांलागीं वेगळा जो ज्ञान- । सदानंदघन सत्यरूप २
तो हा प्रत्यगात्मा नित्य प्रकाशित । अंतर्यामीं स्थित गूढपणें ३
ऐशा आत्मयाचें ज्ञान मज होवो । पूर्ण स्वानुभवो लाहुनियां ४
महाराजा ! ऐसा अनुग्रह थोर । करा मजवर कृपासिंधो ! ५

( ३७ )

दृश्य हें स्वभावें जड, ज्ञानहीन । ज्ञातयावांचून भासेचि ना १
तेणें भासक तो आत्मा सर्वगत । भाव हा निश्चित विवेकाचा·
ऐसा सर्वगत- आत्मयाचा भाव । माझे मनीं ठाव धरो आतां ३
महाराजा ! ऐसा अनुग्रह थोर । करा मजवर कृपासिंधो ! ४

( ३८ )

चैतन्याचे योगें जड हें भासतें । तेणें चैतन्य तें होय आधीं १
म्हणूनि मागुती भासणाऱ्या त्यास । रूप येई खास चैतन्याचें २

या रिती जडातें वोसंडून दूर । चित्त निरंतर चिद्रूप हो, ३
महाराजा ! ऐसा अनुग्रह थोर । करा मजवर कृपासिंधो ! ४

(३९)

'सर्व हीं प्रज्ञान-आत्मयाचीं नांवें ।' श्रुतीचें जाणावें वचन हें
मग देहेंद्रियांलागीं जें जाणत । त्वं-पदार्थभूत प्रज्ञान जें २
तेंचि पर ब्रह्म, दृश्याचें या मूळ । भेद नाहीं तिळ दोघांसी या
तेंचि 'एष ब्रह्म' इत्यादि वाक्यांहीं । वेदें केलें पाहीं निरूपित ४
तया ऐतरेयमहावाक्यार्थाचें । ज्ञान मज साचें सिद्ध होवो ५
महाराजा, ऐसा अनुग्रह थोर । करा मजवर कृपासिंधो ! ६

(४०)

ब्रह्म हें सर्वत्र संचलेंसे; तरी । माझ्याहि अंतरीं तेंचि होय. १
अंतःप्रज्ञान जें, कीं तें ब्रह्म पर । दोघांचें साचार ज्ञान रूप २
ऐतरेयाचेंही हेंचि महावाक्य । दाविताहे ऐक्य उभयांचें ३
म्हणोनि 'प्रज्ञानं ब्रह्म' याचा पूर्ण । अर्थ मज तूर्ण ठसो मनीं
महाराजा, ऐसा अनुग्रह थोर । करा मजवर कृपासिंधो ! ५

(४१)

आत्मयासंनिधीं वर्ततीं म्हणून । होतीं भासमान देहादि हीं १
यालागीं आत्माचि शुद्ध-ज्ञानघन । देहादिकें आन नाहीं कोणी
ऐसा मज चिदात्मानुभव खरा । प्राप्त होवो पुरा दृढपणें ३
महाराजा, ऐसा अनुग्रह थोर । करा मजवर कृपासिंधो ! ४

(४२)

आत्मसंगतीनें देहादि हीं सारीं । दुःखदही तरी प्रिय होतीं १
येणें योगें आत्मा परमानंदात्मक । गोष्ट हे सम्यक सिद्ध होते २

तरी या आत्मीय आनंदानुभवें । पूर्णचि मीं व्हावें निरंतर ३
महाराजा, ऐसा अनुग्रह थोर । करा मजवर कृपासिंधो! ४

( ४३ )

देश काल वस्तु तीन या मर्यादा । अंगीं ज्याचे कदा नलगती १
ऐसें अद्वितीय पर ब्रह्म मज । प्राप्त होवो आज जैसें तैसें २
महाराजा, ऐसा अनुग्रह थोर । करा मजवर कृपासिंधो! ३

( ४४ )

क्रोधादि वृत्ति ज्या उद्भवती चित्तीं । पूर्वापर स्मृती घालवून १
पूर्वीचे संस्कार हेंचि त्यांचें मूळ । तें होई निर्मूळ विवेकानें २
आणि तेणें योगें क्षमेची सद्वृत्ती । वाढूनियां चित्तीं होवो दृढ ३
मग बाह्य कांहीं निमित्त होतांही । क्रोधादि वृत्ति ही नये उठूं ४
महाराजा, ऐसा अनुग्रह थोर । करा मजवर कृपासिंधो! ५

( ४५ )

'मीच विष्णु; मजमाजी हें कल्पित।' कळे हें साक्षात यत्कृपेनें
त्या श्रीविष्णुचिया पादांबुजावरी । प्रीत निरंतरीं जडो मम २
कदापि तेथूनि न चळो हें मन । विशेष रंगून राहो सदा ३
महाराजा, ऐसा अनुग्रह थोर । करा मजवर कृपासिंधो! ४

( ४६ )

विश्व हें तों जड, पावे सत्तेप्रती । लाधे जै संगती आत्मयाची
याचिलागीं आत्मा विश्वीं सर्वगत । ऐसी ठसो मात मनीं माझे
महाराजा! ऐसा अनुग्रह थोर । करा मजवर कृपासिंधो! ३

( ४७ )

सर्व अर्थ साधावया हाचि देख । आत्मा होय एक हेतुभूत १
आणि हाचि सर्वीं संबंध जोडितो । तेणें परिपूर्ण तो ऐसें सिद्ध

तरी हा परिपूर्ण आत्मभाव थोर । माझे चित्तावर देवो ठाण ३
महाराजा ! ऐसा अनुग्रह थोर । करा मजवर कृपासिंधो ! ४

(४८)

र्व देशीं सर्व काळीं या आत्म्याचा । वास आहे साचा भानरूपें
तो प्रत्यक्ष आहे समस्तांस । साधनीं सायास नकोत त्या २
कां उपायांवांचून हा ज्ञान- । आत्मा प्रकाशून राहे स्वयें
ा स्वयंसिद्ध आणि जो साक्षात् । तो मज विज्ञात होवो आत्मा
हाराजा, ऐसा अनुग्रह थोर । करा मजवर कृपासिंधो ! ५

(४९)

थें जो पदार्थ आत्मयें देखिला । तेथें तो राहिला आत्मा दृढ १
सें नाहीं कदा; आन वस्तूवरी । जाय तो सत्वरी दुजे क्षणीं २
गुणें हा आत्मा असंगचि ठरे । वायुऐसा फिरे सर्वां ठायीं ३
सा या आत्म्याचे असंगपणाचा । प्रत्यय यो साचा
महाराजा, ऐसा अनुग्रह थोर । करा मजवर कृपासिंधो ! ५

(५०)

ा निरवयव, पुन्हा कोणासवें । संगही न पावे ऐसा शुद्ध
नित्यमुक्त बोलिजे तो जनीं । भाव तो मन्मनीं रिघो वेगें २
ाणि तेणें नित्य-मुक्त मी संतत । ऐसा सदोदित प्रत्यय यो ३
राजा, ऐसा अनुग्रह थोर । करा मजवर कृपासिंधो ! ४

(५१)

आत्मा ज्ञानघन, ज्ञेय नोहे खास । परि व्यवहारांस चालवी तो १
ाणि सत्तातें प्रत्यक्षानुभूत । नित्य-प्रकाशित निजांगेंच २
तरी माझें न त्यातें अनुभवून । स्वप्रकाशघन-पदीं पावो ३
महाराजा, ऐसा अनुग्रह थोर । करा मजवर कृपासिंधो ! ४

(५२)

अन्य साधनांची अपेक्षा न ज्यास। भासवी स्वतांस स्वयेंच जो
स्वयंप्रकाश तो आत्मा नेमें म्हणूं। तेंचि मग जाणूं स्वस्वरूप२
आणि हा स्वप्रकाशाचा साक्षात्कार। नित्य-निरंतर घरूं मनीं
महाराजा, ऐसा अनुग्रह थोर। करा मजवर कृपासिंधो!

## उपसंहार.

या रीती प्रार्थुनी श्रीगुरूंच्या पदा। आह्मी भवापदा निवारूं
आणि उभवूं हें मोक्षाचें निशाण। या रे सारे जण मिळूं ये
झेंडा हा ज्ञानाचा फडकताहे पहा। श्रीगुरूचे अहा! दावी
त्याचे तळीं सारे गडी हे आपण। श्रीगुरूचे गुण वागूं चल
आणि धुडकावून लावूं या भवास। मी-माझें हें खास नि
महाराजा! ऐसा अनुग्रह थोर। करा मजवर कृपासिंधो!

× × × × × ×

कोणीएक देह कोणीएक चित्त। कोणीएक तेथ बुद्धि उ
साधनसामग्री कोणीएक तेथ। निमित्तही होत कोणीएक
सर्वही या कथा अज्ञानांतर्गत। साच तो निश्चित एकीएक
तोचि होई कर्ता तोचि करविता। अकर्ताचि स्वतः पुनः तो
कवित्व कीं नाना कर्म सर्व त्याचें। स्थळ देथ कैचें मीपणा
महाराजा! ऐसा अनुग्रह थोर। करा मजवर कृपासिंधो!

---

सूचना—संस्कृत प्रकरणांत प्रा. २२, ओ. ९ वर प्रश्नचिन्हापुढे **कर्तव्याभावेपि इदानीं मम जीवन्मुक्तत्वं अस्ति न वा?** हें वाक्य घेणें राहिलें, तें वाचकांनीं कृपा करून लेखें लिहून घ्यावें; प्रा. ३० ओ. १ वर शेवटचा शब्द 'शरीराभावे' असा करावा.